Regd. No. 9023/57

**बुक पोस्ट**

प्रति,

SADBHAKTI PRAKASH

द्वारा
**सद्भक्ति-प्रसारक मंडळी**
श्रीशंकर लॉज, सरस्वतीबाग,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०००६०.

**शब्दविकास :** विद्या धुमे, विकास प्रिंटर्स, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई : ६०.फोन : २८२४५२७२




(वर्ष ९३) चैत्र ते ज्येष्ठ शके १९४२ - एप्रिल ते जून २०२१ (संयुक्तांक ७ ते ९)

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल / वृत्तनिवेदन | १ |
| २) | गुरुवर्य श्री. भाईंचे प्रवचन | ४ |
| ३) | सद्गुरु श्री. दादाभाईंचे प्रवचन | १२ |
| ४) | अमृतकण | १८ |
| ५) | उत्सव - महोत्सवांतील कार्यक्रम | २० |
| ६) | महत्वाच्या सूचना | २८ |
| ७) | विनंती | २९ |
| ८) | निवेदन | ३० |
| ९) | कळकळीची प्रार्थना | ३२ |

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

तुमच्या दर्शनाविण राहवेना ।
गुरुनाथा तुमचा विरह साहवेना ।।
कां रुष्ट जाहला जगतावरती ।
काय चुकले सांगा कृपामूर्ति ।।
शीघ्र नाश करावा ह्या आपत्तींचा ।
मार्ग मोकळा करावा तव दर्शनाचा ।।
कधी घेऊं तुमचे दर्शन, चरणी ठेवूं डोई ।
असे वाटते सद्‌गुरुनाथा, हीच विनंती पायी ।।

संपादिका : सौ. निर्मला चंद्रशेखर काळे



।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।



**- संपादकाचे बोल -**

**(वर्ष ९३) एप्रिल ते जून २०२१ (संयुक्तांक ७ ते ९)**

**जानेवारी ते मार्च (पौष, माघ, फाल्गुन) महिन्यांतील कार्यक्रमांचा गोषवारा :-**

हा गोषवारा लिहितांना श्री सद्‌गुरुंच्या दर्शनाला मंदिरात जाता येत नाही, ही खंत सतत वाटते. सद्भक्तीचा हा अंक शतकाकडे वाटचाल करीत आहे. श्री सद्‌गुरुंना प्रार्थना आहे कीं, ह्या सर्व संकटांमधून मार्ग

काढून आम्हाला स्फूर्ती द्यावी व सर्वांचे रक्षण करून तुमची सेवा करण्याासाठी आम्हाला मंदिरांत येण्यासाठी बळ द्यावे. ही कळकळीची विनंती आहे.

**शुक्रवार दि. १.१.२०२१** गोखिवरे येथील श्रीकृष्णमूर्ति स्थापना दिन होता. पण टाळेबंदीमुळे भजन करण्यास कुणीच जाऊ शकले नाही.

**सोमवार दि. ४.१.२०२१**ला (मार्गशीर्ष कृष्ण ६) श्री मोरयागोसावी व श्री रंगनाथ स्वामी पुण्यितथी दिन होता.

**गुरुवार दि. १४.१.२०२१**ला (मकर संक्रांत) होती.

**बुधवार दि. ३.२.२०२१**ला (पौष कृष्ण ६) श्री तात्यासाहेब कोटणीस महाराज पुण्यतिथी दिन होता.

**रविवार दि. ७.२.२०२१** रोजी (पौष कृष्ण एकादशी-षट्‌तिला एकादशी) श्री सद्‌गुरु पार्वती माता पुण्यतिथी दिन होता. एकादशणी सकाळी ७ वाजता गाभाऱ्यांतच भटजींच्या हस्ते झाली व (१) माझी देवपूजा देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझी ही एकादशणीच्या वेळी म्हटली जाणारी पदें व प्रार्थना म्हणण्यांत आली.

**परात्पर गुरु श्री नारायणबाबा रत्नागिरीवासी व परमेष्ठीगुरु राधाकृष्ण तोरणे पुण्यतिथ्योत्सव.**

**शुक्रवार दि. १२.२.२०२१** (माघ शुद्ध प्रतिपदा)ला श्री लक्ष्मीमाता पुण्यतिथी दिन होता.

**शनिवार दि. १३.२.२०२१** रोजी (माघ शुद्ध द्वितीया) श्री नारायणबाबा रत्नागिरीवासी व परमेष्ठी गुरु राधाकृष्ण तोरणे पुण्यतिथीदिन होता. सकाळी गाभाऱ्यांतच एकादशणी झाली व (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणूनि माझा ही दोन पदे व प्रार्थना म्हणण्यांत आली.

**सोमवार दि. १५.२.२०२१** (माघ शुद्ध चतुर्थी) रोजी श्री गणेश जयंती होती.

**मंगळवार दि. १६.२.२०२१** (माघ शुद्ध पंचमी - वसंत पंचमी) रोजी श्री शांतादुर्गा महोत्सव व बालमंडळाचा वाढदिवस होता.



**शनिवार दि. २७.२.२०२१**ला (माघ पौर्णिमा) होती. मंगेश महोत्सव होता.

**रविवार दि. ७.३.२०२१** रोजी (माघ शुद्ध नवमी) श्री रामदास नवमी होती.

**गुरुवार दि. ११.३.२०२१**ला (माघ वेद्य त्रयोदशी) महाशिवरात्र होती.

**सोमवार दि. १५.३.२०२१**ला श्री रामकृष्ण जयंती होती.

**श्री दत्तमूर्ति व श्री नारायण महाराजांच्या सुवर्णपादुका स्थापना दिन श्री रघुनाथस्वामी पादुका स्थापना दिन व श्री रामेश्वर मंदिराचा वर्धापन दिन.**

**मंगळवार दि. २०.३.२०२१** (माघ शुद्ध सप्त्मी) रोजी श्री रघुनाथ स्वामींच्या पादुका स्थापना दिन होता. सकाळी गाभाऱ्यांतच एकादशणी केली गेली व एकादशणीच्या वेळची पदें व प्रार्थना म्हणण्यांत आली.

**बुधवार दि. २४.३.२०२१** (माघ शुद्ध दशमी)ला श्री दत्त पादुका स्थापना दिन व श्री रामेश्वर मंदिर स्थापना दिन होता. गाभाऱ्यांतच भटजींनी सकाळी एकादशणी केली व (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा व प्रार्थना म्हणण्यांत आली.

**गुरुवार दि. २५.३.२०२१** (फाल्गुन शुद्ध एकादशी आमलकी एकादशी)ला प्रतिष्ठान चरित्र वाचनास प्रारंभ झाला.

**रविवार दि. २८.३.२०२१** रोजी श्री गौरांग प्रभुजयंती होती.

**सोमवार दि. २९.३.२०२१** (फाल्गुन कृष्ण प्रतिपदा) रोजी परमप्रिय सद्‌गुरु श्री दादाभाईंचा पुण्यतिथी दिन होता. हा दिवस म्हणजे सर्व सद्‌भक्तांसाठी एक पर्वणीच असते. पण यावर्षी कांहीच उपभोगतां आले नाही. सकाळी गुरुजींनी गाभाऱ्यांतच एकादशणी केली व (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा आणि तुमच्या दर्शनास येता यावे ही कळकळीची प्रार्थना केली.

मंगळवार दि. ३०.३.२०२१ (फाल्गुन वद्य द्वितीया)ला श्री तुकाराम बीज) श्री तुकाराम महाराजांचा पुण्यतिथी दिन होता.

**: इति :**

।। श्री सद्गुरुभ्योनमः ।।

# श्री गुरुवर्य
# श्री भाईंचे प्रवचन

**२६.३.१९३१**

*श्रद्धालुर्मे कथा : श्रृण्वन्सुभद्रा लोक पावनीः ।*
*गायन्ननुरस्मरन्कर्म जन्मचाभिनयन्मुहुः ।। (ए.भा. ११/२३)*

आज आपण भागवतांत श्रवणासंबंधानें जें वाचले, त्यांत पांच मुख्य मुद्दे लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. एक वक्ता कुशल असावा त्याचप्रमाणे श्रोता ही परम दक्ष असला पाहिजे. एकनाथ महाराजांनी वक्त्याच्या गुणांचे येणेंप्रमाणे वर्णन केले आहे :- ***"शब्दज्ञानें पारगंतु । ब्रह्मानंदे सदा डुल्लतू। शिष्य प्रबोधनीं समर्थु। यथोचित निजभावें।।"*** वक्त्याला आत्मज्ञान अवश्य असलें पाहिजे, कारण त्याशिवाय त्याच्या ठिकाणी वैराग्य असूं शकणार नाहींत. सविवेक नैराश्यवक्त ।। शिवाय त्याला पूर्ण शास्त्रज्ञान असले पाहिजे नाहीं तर त्याला श्रोत्यांचे संशय दूर करितां येणार नाहीत :- ***"शब्दज्ञानें पारंगत । आणि शिष्य प्रबोधनीं समर्थ ।।"*** असे गुण ज्याच्या अंगी असतील तोच वक्ता ह्या पदवीला योग्य ठरतो. वक्त्याच्या अंगी हें गुण नसतील, तर त्याच्या हातून श्रोत्यांचे कल्याण होणार नाही. वक्त्याच्या



ठिकाणीं जर वैराग्य व ज्ञान नसेल तर श्रोत्यांना त्यांची प्राप्ती कशी होणार ? विहिरींत असेल तरच पोहऱ्यांत येईल. तसेंच त्याच्या भाषणांत शब्द लालित्य, हाव भाव, विनोद आणि मुख्यत्वें करून श्रृंगार रस ह्यांना मुळींच जागा असूं नये. वक्त्यानें ह्या सर्व गोष्टी टाळून सावधगिरीने भाषण करावें. दृष्टांत म्हणून कांही प्रापंचिक गोष्टी सांगण्याची वेळ आलीच, तर त्या मोठ्या सावधगिरीनें सांगाव्या. त्यांत श्रृंगार रस नसावा, कारण त्या ऐकून श्रोत्यांच्या मनांत पूर्व संस्कारामुळें विषय वासना जागृत होण्याचा संभव आहे. तसेंच त्यानें लाक्षणिक भाषण करूं नये, कारणे तेणेंकरून श्रोत्यांचे अंत:करण दुखावण्याचा संभव आहे. ह्याकरितां दृष्टांत सांगतांना वक्त्यानें तात्पर्याकडे लक्ष द्यावे व भाषण असें करावें कीं तेणेंकरून श्रोत्यांचा सत्त्वगुण उंचबळेल व त्यांचे कार्य होईल आणि अधिकारी श्रोता मिळाला तर पावसाच्या दृष्टीप्रमाणें त्याला उपदेश करावा.

आतां श्रोत्यांच्या अंगी कोणते अवगुण नसावे ह्याविषयीं नाथ म्हणतात कीं :- ***"श्रवणीं ध्यानीं अंतराय । लय विक्षेप कषाय । कां रस स्वदुही होय । हे चारी अपाय चुकवावे।।"*** लय, विक्षेप, कषाय व रस स्वाद हे चार अवगुण श्रोत्यांमध्यें असूं नये. 'लय' म्हणजे श्रवण चाललें असतां निद्रा लागणें हे तमोगुणाचे द्योतक आहे. ***"कां कथे माजी झोप लागे । तो जाणावा वेगें लय विक्षेपू ।।"*** ह्या लयामुळे वक्त्याने कितीही जरी कल्याणकारक गोष्टी सांगितल्या तरी त्यांचा श्रोत्यावर काहीं परिणाम होत नाही, तेव्हा अर्थात् त्याच्यापासून कांही फायदा होत नाही. ह्या अवगुणाचा अंगी वास नसावा म्हणून नामदेव विठोबाची प्रार्थना करितात :- ***"कीर्तनीं बैसता निद्रें नागविलें । मन माझें गुंतलें विषय सुखा ।।"*** लयापासून बचाव व्हावा म्हणून तुकाराम महाराजांनी एक उपाय सांगितला आहे तो असा :- ***"लोलुपता काय निद्रेसि जिंकावे । भोजन असावे परिमीत ।।"*** निद्रेंचे बंड कमी करण्याकरितां मिताहार करावा, म्हणजे देह संरक्षणार्थ

जेवढें अन्न जरूर आहे, तेवढेंच घ्यावें. दुसरा अवगुण जो विक्षेप त्याची व्याख्या एकनाथ महाराजांनी केली आहे, ती अशी :- ***“हरि कथे पाशीं बैसला दिसे । परी कथे पाशी मन ही नसे । चित्त भंवे पिसें जैसें । तो मर्कट वेषें विक्षेपु।।”*** कीर्तन अगर प्रवचन चालले असतां मन विषयांत गुंतलेले असतें त्यामुळें कीर्तनांत अगर प्रवचनांत कोणत्या हितावह गोष्टी सांगण्यात येतात, त्यांच्याकडे त्या श्रोत्याचें लक्षच नसतें :-***“मन माझें गुंतलें विषय सुखा।।”*** अशी आपली स्थिती होऊं नये म्हणून नामदेव नारायणाची मोठ्या कळकळीनें प्रार्थना करितात. मन जर अशा रीतीनें विषयांत भटकलें, तर तें अधोगतीला जाईल :-***“उद्धरेदात्मनात्मानं नात्मानभवसादयेत । आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मन:।।”*** (भ.गी. ६/५) याकरितां मनाला विषयांतून काढून आत्म्याकडे लावावें. ह्या उपायाला प्रत्याहार म्हणतात. विक्षेपाचा नाश करण्यास हाच एक उत्तम उपाय आहे :- ***“विक्षेपाचा नाश कराया प्रत्याहार करा ।।”*** पूव संस्कारानें मन विषयाकडे खेंचलें जाईल. पण त्याला लहान मुलाप्रमाणें युक्तीनें व गोडीगुलाबीनें स्वरूपाकडे लावावें. ते कसें लावावें हें ही आपणाला संतांनी शिकविलें आहे :- ***“तूं ये रे मना, सावध सावध होई रे ।। सावध तूं होसी जरी, पर ब्रह्मा नाहीं उरी । पावसिल आनंदा घरीं रे ।।”*** विचार करशील तर तूंच परब्रह्म आहेस असें तुझ्या अनुभवास येईल. केवळ भ्रमामुळें परब्रह्म तुझ्या पासून लांब झालें आहे. तुकाराम महाराज ही ह्या संबंधानें असेंच म्हणतात :- ***“कोठोनिया कांही नलगे आणावें । नलगे कोठें जावें तरावया ।।”*** विषयांची गोडी हेंच विक्षेप उठवण्याचे कारण आहे. ***“आदि गोड अंती दु:ख, विख रांधिलें पीयुख । तैसें विषयांचें सुख रे।।”*** विषय सुख गोड लागतें म्हणून मन त्याच्या कडे धांव घेतें, परंतु त्याचा अंत दु:खांत होतो ह्याचा तें विचार करीत नाही. या करितां जेव्हां जेव्हां मन विषयाकडे धांव घेईल, तेव्हां तेव्हां प्रत्याहार करून त्याला



तेथून काढून स्वरूपाकडे लावावें.

आतां श्रोत्यांचा तिसरा दोष जों ‘कषाय’ त्याचा आपण विचार करूं कषाय म्हणजे श्रवण, ध्यान वगैरे करित असतां नाना तऱ्हेचे रंग, तारांचे घोंस वगैरे दिसणे हा ही एक प्रकारचा विक्षेपच आहे. कोणती तरी मूर्ती दिसणें हा ही कषायच आहे. एखादी मूर्ती दिसली म्हणून तो साक्षात्कार झाला असें समजूं नये :- ***“करितां नाना आचार । प्राप्त नोहे अगोचर । जरी झाला साक्षात्कार । सगुण मूर्तीच ।।”*** हा कषाय जाण्याला सद्गुरुलाच शरण गेले पाहिजे :-***“जेथें अहंता गळे । मन बुद्धि ही मावळे । साधनें करितां नातळे । त्याचा दाता सद्गुरु ।।”***

चौथा अवगुण ‘रसस्वाद’ म्हणजे शब्द लालित्य, प्रवचनांत अलंकारिक शब्द वापरून भाषण करणें आणि विनोद करून चार चौघांना हांसवणें हें सर्व ह्या सदराखालीं मोडतात. वक्त्यानें अशातऱ्हेचें भाषण करूं नये, व जेथें असलें भाषण होत असेल तेथें सात्त्विक वृत्तीच्या माणसानें जाऊं नये. ह्या भाषणानें तात्पुरता आनंद होईल हें खरे पण तो खवा आनंद नव्हें. तो एक प्रकारचा विषयानंदच आहे.

येथपर्यंत चार अवगुणांचे विवेचन झाले. आतां श्रोत्यांच्या ठिकाणीं हे अवगुण नसतील व ते सर्व प्रकारें योग्य असतील. परंतु वक्त्याच्या अंगी वर सांगितलेले गुण नसतील, तर श्रोत्यांनी असा वक्ता मिळेपर्यंत काय करावें, व चांगले श्रोते न मिळाले तर वक्त्यानें काय करावें ह्या प्रश्नाचा आपण विचार करूं :- ***“सविवेक नैराश्य वक्ता । जोडल्या श्रद्धेनें ऐकावी कथा । कां सज्ञान मिळालिया श्रोता । स्वयें कथा सांगावी ।। जैं श्रोता वक्ता दोन्ही नाहीं । तैं रिघावें मनाच्या ठायीं । कां माझी जन्म कर्मे जें काहीं । एकलाही विचारी ।। त्यजुनियां कामाचे बीज । सांडूनि लौकिकाची लाज । कीर्तनीं नाचावें भोज । गरुड ध्वज स्मरोनी ।।”*** श्रोता चांगला नसेल तर वक्त्यानें आपल्याच निजानंदांत पडून रहावें.

तसेंच जर वक्ता कुशल, ज्ञानी व वैराग्यशील नसेल, तर श्रोत्यानें तुकाराम महाराजांनी सांगितलें आहे तसें करावें :- ***"ठायींच बैसूनि करा एक चित्त । आवडीं अनंत आळवावा ।।", "गाऊनियां मधुर नाम नाचा । पाहो मग भ्रम कसा हरिना मनाचा ।।"*** असें केल्यानें मुमुक्षूच्या मनाचा भ्रम म्हणजे वर सांगितलेले दोष जातील आणि त्याचें अंत:करण शुद्ध होईल.

वर निवेदन केलेल्या दोषांशिवाय श्रवणांत आणखी तीन प्रकारच्या अडचणी येतात, त्याही दूर झाल्या पाहिजेत :- ***"श्रवणीं ध्यानीं हे अवगुण। तैसाचि त्रिविध प्रेमा जाण । तो जाणती विचक्षण । ऐक लक्षण सांगेन ।।"*** एक तामसिक प्रेम, दुसरा राजसिक प्रेम, आणि तिसरा मिश्र सात्त्विक प्रेम. मेल्या गेल्याची वार्ता ऐकून, किंवा दु:खाच्या कथा ऐकून डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागतात. कंठ दाटतो, अंगाला थर काप सुटतो अशी स्थिति ज्यामुळें होते, त्याला तामसिक प्रेम म्हणतात :- ***"दु:ख शोकाची अवस्था । कां गेल्या मेल्यांची वार्ता । अत्यंत विलापाची कथा । ज्यासी ऐकतां मन न संठे । नेत्रीं अश्रूंचिया धारा । स्फुंदनें कांपे थर थरा । प्रेम विलाप अवसरा । जो जाण खरा तामसू ।।"***

दुसरा राजस प्रेम. पुराण प्रसिद्ध किंवा इतिहास प्रसिद्ध पुरुषांच्या गोष्टी वाचून अथवा ऐकून त्यामुळें अंत:करणांत प्रेमाचें भरतें येतें, ते राजस प्रेम जाणावा :- ***"महावीरांचे शौर्यपण । ऐकोनि युद्ध दारुण । अत्यंत हरिखें उल्हासे मन । तो प्रेमा जाण राजस ।।"*** ह्या राजस प्रेमाचें उदाहरण म्हणून आपणाला एक गोष्ट सांगतो. एका राजाच्या पदरीं ॲथेल्लो नांवाचा एक शिद्धी जातीचा सेनापती होता. या राजाचें दुसऱ्या एका राजाशीं युद्ध सुरू झालें. त्यात ॲथेल्लोनें पूर्ण विजय मिळविला. युद्धांतून परत आल्यावर ॲथेल्लो राजाला युद्धाची हकीगत व त्या बरोबरच आपल्या शौर्याच्या गोष्टी सांगत असतां राजाची डेस्डेमोना नांवाची मुलगी जवळ होती. ॲथल्लोच्या गोष्टी ऐकून तिला त्याच्या विषयीं इतका आदर वाटूं



लागला आणि त्याच्यावर तिचें इतकें प्रेम जडलें कीं तिने त्याच्याशींच विवाह करण्याचा निश्चय केला, आणि तिच्या बापाने पुष्कळ आढेवेढे घेतले, तरी शेवटीं तिनें त्याचें मन वळविलें व तिचें त्याच्याशीं लग्न लागले. परंतु राज घराण्यांतील सुंदर, गौरवर्णाच्या मुलीनें एका काळ्या कुळकुळीत शिद्धयाशीं लग्न लावावें हें दरबारांतील सरदारांना आवडलें नाही, आणि त्यापैकी आयागों नांवाच्या एका सरदारानें युक्ति प्रयुक्तीनें ॲथेल्लोचे डेस्डेमोनाविषयीं मन कलुषित केलें त्याचा असा परिणाम झाला कीं ॲथेल्लोने रागाच्या भरात डेस्डेमोनाचा खून केला. ह्यावरून राजस प्रेमाचा शेवट दु:खांतच कसा होतो हें उघड दिसते.

आतां मिश्र सात्त्विक प्रेमाचे लक्षण काय आहे हें पाहू. सगुण मूर्तीचें वर्णन ऐकून जें प्रेम येतें, ते मिश्र सात्त्विक प्रेम जाणावा :- ***"सगुण मूर्तीची संपदा । शंख चक्र पद्म गदा । पीतांबर धारी गोविंदा । ऐकोनि आनंदा जो भरे ।। नेत्री आनंद जीवन । हृदयीं न संठे स्फुंदन । कृष्णमय जालें मन । तो प्रेमा जाण सात्त्विक ।।"***

ह्या तीन प्रेमा पेक्षां ही एक अति उत्कृष्ट प्रेम आहे. त्याला शुद्ध सात्त्विक प्रेम म्हणतात :- ***"या वरी जो प्रेमा चौथा । अतर्क्य तर्केना सर्वथा ।। उद्धवा तूं मजलागी पढियंता । तो ही आतां सांगेन ।।"*** याज्ञवल्क्य व मैत्रेयीं यांच्यामध्यें भक्ति संबंधानें वाद विवाद झाला, त्या योगें मैत्रेयीच्या प्रेमाला ऊत आला, आणि तिनें याज्ञवल्क्याशी लग्न केलें. याज्ञवल्क्याच्या संगतींत मैत्रेयीला पूर्ण ज्ञान झालें. तेव्हां तिची अशी स्थिती झाली :- ***"चित्त चैतन्य पडतां मिठी । सुटतां लिगं देहाची गांठी । नेत्री अश्रूंचा पूर दाटी । रोमांच उठी सर्वांगी ।। जीव भावाची दशा आटे । अनिवार बाष्प कंठीं दाढे । कांही न केल्या शब्द न फुटे । पुरु लोटे स्वेदाचा ।। नेत्र झाले उन्मिलीत । दृष्टी पुंजाळे जेथिचें तेथ । विस्मयाचें भरतें येत । वोसंडत स्वानंदे ।। हा जाण पां प्रेमा चौथा । उत्तम भागवताची अवस्था ।***

***तूज म्यां सांगितली तत्त्वतां । इचा जाणता मी एकू ।। निर्गुणीं जो प्रेमा जाण । ते शोधित सत्त्वाचें लक्षण । हें मी जाणे उणखूण कां ब्रह्म संपन्न जाणती ।।"***

एकदां जगन्नाथराय पंडित बादशहाजवळ कांही पारमार्थिक विषयावर बोलत असतां तें भाषण ऐकून बादशहाची कन्या जवळच बसली होती, तिला प्रेमाचें अतिशयच भरतें आलें आणि तिनें बापाजवळ असा हट्ट घेतला कीं, मी लग्न करीन तर ह्यांच्याशींच करीन. जगन्नाथराय ब्राह्मण व राजकन्या मुसलमानी धर्माची, तेव्हां त्यांचें लग्न कसें होईल ह्याचा बादशहाला मोठा विचार पडला. तथापि बादशहानें आपल्या मुलीची इच्छा जगन्नाथरायांच्या कानावर घातली व पुढें त्यानें तिच्या इच्छेस मान देऊन तिच्याशी लग्न केलें. तेव्हां सर्व ब्राह्मणांनी त्याला वाळीत टाकलें, व गंगेवर स्नान करण्याची मनाई केली. त्यांना फार दु:ख झाले व तें गंगेच्या घाटांवर बसून तिचें स्तवन करू लागले. पदाचें एक एक कडवें तें म्हणू लागले, त्यासरशी गंगेच्या पाण्याला भरतें येऊं लागलें व तें एक एक पायरी वर चढूं लागले. करितां करितां शेवटी ज्या पायरीवर जगन्नाथराय बायकोसह बसले होते, तेथें पाणी लागून गंगेनेंच त्या दोघांना स्नान घातलें तेव्हां सर्व लोकांची खात्री झालीं कीं त्यांचे प्रेम वैषयिक नसून शुद्ध पारमार्थिक आहे.

शुद्ध सत्त्वाचें प्रेम कसें असतें, त्याचीं बाह्य चिन्हें कशीं असतात व तशा प्रेमाचा आपणाला अनुभव यावा म्हणून तुकाराम महाराज ईश्वराची प्रार्थना करितात :- ***"नाम आठवितां सद्गदित कंठी । प्रेम वाटे पोटीं ऐसें करीं ।।"*** हें भगवंता । तुझें नाम स्मरण करितांना नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहत आहेत, सद्गदित झाल्यामुळें कंठ निरोध होऊन तोंडातून शब्द फुटत नाहीं, सर्व शरीरावर अष्ट सात्त्विक भावांच्या विकासामुळें रोमांच आले आहेत अशी माझी अवस्था कधीं होईल बरें ? ***"रोमांच जीवन आनंदाश्रु नेत्रीं । अष्टांग ही गात्रीं प्रेम तुझे ।। सर्व ही शरीर वेंचो या कीर्तनीं । गाऊं निशिदिनीं नाम तुझें ।। तुका म्हणें दुजें न करी कल्पांती । सर्वदा विश्रांचि संता पायीं ।।"***



सारांश उपरिनिर्दिष्ट अवगुण रहित श्रोता मिळेपर्यंत वैराग्यशील व ज्ञानी वक्त्यानें मौन धरून आपल्या स्वानंदांत असावे. तसेंच जर श्रोता दक्ष असून अवगुण रहित असेल आणि त्याला वैराग्यशील व ज्ञानी वक्ता मिळेल, तरच त्यानें त्याच्यापासून श्रवण करावे, नाहीं तर तसा वक्ता मिळें पर्यंत त्यानें ह्याच मार्गानें जावें :-

***"गाऊनियां मधुर हे हरि नाम नाचा । पाहो मग भ्रम कसा हरिना मनाचा ।।"***

***"त्यजूनियां कामाचें बीज । सांडूनि लौकिकाची लाज । कीर्तनीं नाचावें भोज । गरुडध्वज स्मरोनी ।।" (ए.भा. ११/७३१)***

**– नारायण –**

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।

# श्री सद्‌गुरु
# श्री दादाभाईंचे प्रवचन

**गुरुवार : २९.४.४३**
**सकाळी : ८.४० ते ९.२०**

*केधवां भेटसी माझीया जीवलगा ।।*

सर्व सोडून देऊन एक ईश्वरच आपला आहे अशी जेव्हां भावना होईल तेव्हांच हे उद्गार निघतील. ईश्वराने जर मागितले तर सर्वस्वावर पाणी सोडण्याची तयारी पाहिजे.

श्री अमृतरायाचें एक वैराग्यपरपद आहे. सर्व प्रकारचे विलास भोगत असतां ते म्हणतात :-

*अशाश्वत संग्रह कोण करी ।।धृ.।।*
*कोण करी घर सोपे माड्या । विवरी वस्ती बरी ।।१।।*
*चिरगुट चिंध्या जोडून कंथा । गोधडी हेचि बरी ।।२।।*
*नित्य नूतन देईल माधव । भिक्षा तेचि बरी ।।३।।*
*आत्मस्त्री सुत परकी होती । ठेविती भूमिवरी ।।४।।*
*अमृत म्हणे मज भिक्षा डोहळे । उठती अशी लहरीं ।।५।।*

हे त्यांचे विचार व त्यांचा आचार परस्पर विरोधी होते. त्यांचे हे पद



ऐकून एका संन्यासाला वाटले अशा माहात्म्याचे दर्शन घेऊन त्याच्या संगतीत राहावे व काही काळ त्याची सेवा करावी व आपला उद्धार करून घ्यावा म्हणून तो त्यांना भेटावयास आला पण पाहतो तो काय ? श्रीअमृतराय अगदी थाटांत पलंगावर झोपले आहेत व आजूबाजूचे सर्व थाट अगदी राजेशाही होता तेव्हा त्यानें विचारले हे पद आपलेच ना ? आपणही एखादा बुवाच दिसता. पण अमृतराय म्हणाले, माझे विचार तसे आहेत आणि प्रारब्ध निराळे आहे. तो संन्यासी म्हणाला बरे, आहे. प्रारब्धाच्या सदराखालीं वाटेल ते करता येईल बरे तर आतां लंगोटी नेसून माझ्याबरोबर चला मग पाहून या तुमचे प्रारब्ध श्रीअमृतरायांनी लगेच सर्व अलंकार काढले, कपडें काढले व एक लंगोटी नेसून तसेच निघाले कसलाही विचार केला नाही व त्या संन्यासाबरोबर अरण्यात निघून गेले. तेथें ते विश्रांतीसाठी बसले. नंतर तो संन्यासी पाणी आणण्यास गेला. कर्मधर्म संयोगाने तेथील राजाची राजकन्या त्याच वनांत आली होती व तिचे सेवक पाणी आणण्यास येत होते. त्यांनी पाहिलें तो चेहरा अमृतरायांचा पण ही काय आज तऱ्हा! पण ते म्हणाले संताचे हे असेच असते. आज काहींतरी वैराग्य झाले असेल कारण त्यांची बायकोही तशीच होती.

*मांगे ती लुगडी, सकाप फुगडी, आठां दिसां बांगडी,*
*घालिते फुगडी कधीं न रगडी, फाडितसे आंगडी ।।*
*खैराची सगजी तशी धडधडी, तोंडाळ मोठी खुडी,*
*सोन्याच्या लगडीस देखुनि गुडी ऐशो मां धागडी ।।*
*दारी देत कडी, सदा कडकडी, बोले महा वाकडी,*
*दाणे चोरूनि फांकडी न कळतां घेते मुळे काकडी ।।*
*खाते ती जसि माकडी, वसवसी दांती दिसे खेंकडी,*
*या योगे अमृतेश्वरासी रुचली गंगातीरी झोपडी ।।*

मग त्यांनी जवळ येऊन विचारले महाराज, (कारण ते त्या राजाचे

Prime minister होते.) आज इकडे कोठे ? श्रीअमृतराय म्हणाले, मी कोठे आलो ? मला ह्या संन्याशाने ओढून आणले. त्या नोकरांनी ही बातमी राजकन्येला जाऊन सांगितली किती झाले तरी ते तिला गुरुप्रमाणें पूज्य होते. तिने लगेंच पालखी पाठविली पण श्री अमृतराय म्हणाले अगोदरच त्या संन्याशाने बुवाबाजीत लेखलें आहे व मी जर आलो तर त्याची तशीच खात्री होईल. म्हणून त्यांनी एक गृहस्थ तेथें ठेवला व ते त्यांच्याबरोबर निघून गेले. राजकन्येने त्यांच्या पायातील काटे काढून त्यांना अभ्यंगस्नान घातले व पूर्वी पेक्षांही भरजरी कपडे घालून पलंगावर झोपविलें व एकदोन नोकर त्यांच्या सेवेंत ठेवले. तिकडे तो संन्यासी पाणी घेऊन आला पण पाहतो तो काय श्रीअमृतराय तेथें नाहींत तो मनांशी म्हणाला पहा, मी म्हटले ना हा लबाड आहे मी गेलो म्हणजे हा पळून जाईल तसेंच झाले मग त्यानें तेथील माणसांना विचारले येथें एक संन्यासी आला होता तो कोठे गेला ? ते म्हणाले ते आमचे श्रीअमृताराय होते व त्यांना, येथें राजकन्या आली आहे ती घेऊन गेली व तुम्हांलाही तिकडे बोलवलें आहे. तो संन्यासी त्या नोकरांबरोबर तिकडे गेला त्याने पाहिले श्रीअमृतराय पलंगावर झोपले आहेत दासदासी त्याच्या सेवेला हजर आहेत एकंदरीत पूर्वीपेक्षा जास्त थाट होता. हे सर्व पाहून त्याला पश्चाताप झाला व त्याने त्यांचे चरण धरले व 'संताची फळती नमोऽस्तु ते म्हणता' म्हणून श्री अमृतरायांनी त्याचा उद्धार केला. त्याची खरी इच्छा होती की त्यांच्या कृपेला पात्र व्हावे त्याप्रमाणे ती पूर्ण झाली. मग त्याला प्रारब्ध हे कोठेही गेले तरी बदलत नाही. जंगलात गेले व तसें प्रारब्ध नसले तरी सर्व आपोआप जुळून येते हे त्याला समजले. तात्पर्य श्रीअमृतरायांसारखे झाले पाहिजे. वाटेल त्यावेळी सर्व सोडून देण्याची तयारी पाहिजे. संत हे सर्वस्वाचा त्याग करूनच बसलेले असतात. श्रीए. महाराज सांगतात :-



***प्रपंचांत रहा पण कसें । तर —***

***ऐसें असावें संसारी । जोवरि प्राचिनाची दोरी ।।१।।***

***पक्षी अंगणा आलें । आपुला चारा चरोनि गेले ।।२।।***

पक्षी अंगणातील दाणे टिपतात तेथून हाकललें म्हणजे झाडांवर जाऊन बसतात. एक दिवसापुरते मिळाले कीं झाले. साठवण्याची त्यांची पद्धतच नाही. तसे आपले झाले पाहिजे. कशाचाही संग्रह नको.

***मुली घरचार मांडिला । खेळ मोडोनि टाकिला ।।३।।***

मुली खेळांत सर्व संसार मांडतात पण आईने हांक मारली की जशाच्या तसा गोळा करून जातात. आईच्या दृष्टीनें तो खेळ आहे पण मुलींना खराच वाटतो. तसा हा सर्व प्रपंच संतांना खेळ वाटतो पण आम्हाला तो खरा आहे.

***वाटसरू वाटा आले । प्रात:काळी उठोनि गेले ।।४।।***

***मार्गी बहुसाल भेटले । तेथे मन नाहीं गुंतले ।।५।।***

***एका विनवी जनार्दना । ऐसें असतां भय कोणा ।।६।।***

असे प्राप्त पुरुष अशारीतीनें प्रपंचात राहतात अशी जेव्हा मनाची स्थिती होईल तेव्हाच उद्धार निघतील :-

***केधवां भेटसी माझिया जीवलगा । ये गा पांडुरंगा मायबापा ।।१।।***

ही मुमुक्षुसाठी प्रार्थना आहे. संसाराचा लोभ सोडला पाहिजे. नाहींतर भगवंताची प्राप्ती होणार नाही. संसार करावा पण आसक्ति सोडावी.

***देह गेह स्त्रियादी धन । असक्तां नव्हे आसक्तमन ।***

प्रपंचात राहून त्यापासून अलिप्त असणे हे खरें वैराग्य.

***आशा धरूनि पोटी दिवस लेखी बोटीं ।***

***प्राण ठेऊनि कंठी वाट पाहे ।।२।।***

***चित्त निरंतर ठेऊनि महाद्वारीं ।***

***अखंड पंढरी हृदयीं वसे ।।३।।***

देव आपल्या हृदयांतच आहे.

***देह ही पंढरी आत्मा हा पांडुरंगा ।***

दोन्ही वाऱ्या कराव्या. श्री. तु. महाराजांनी दोन्ही वाऱ्या केल्या.

***श्वासोश्वासी निमीषें, निमीषे । वारी केली पंढरीसी ।।***

शुद्धसत्वगुणी वृत्ती तिनें हृदयांत प्रवेश करून तेथील विठ्ठलाचे दर्शन घ्यावे. हा मार्ग सद्गुरुने दाखविला पाहिजे.

***सहज केवळ ते न तुम्हा कळे । बहुत तर्कबळेहि न आकळे ।***
***गुरुमुखाविणते नकळे गती । म्हणुनि बोलती येचिरीती श्रुति ।।***
***(वा.प.)***

रंगशिले उभा —

श्री.तु. महाराज म्हणतात कीं आत्मशिलेवर उभा राहून (आत्मानुभावात राहून) कीर्तन करतो. अशी वारी केली पाहिजे हीच खरी वारी. पण पंढरपूला जाऊनही वारी करावी. त्या वारीनें विठोबाचे दर्शन होईल पण त्या वारीनें प्रत्यक्ष विठोबा होईल. पण प्रथम ही वारी केलीच पाहिजे. त्यायोगे पुढची वारी करण्याचा अधिकार येईल. असे भगवंतानें गोपींना मग्न केले म्हणजे चार देहाच्या पलीकडे नेले. असे मग्न झाल्याशिवाय साक्षात्कार होणार नाही. कारण ह्या चार देहाच्या पलीकडे आत्मा आहे. त्याचे दर्शन होण्यास ह्या पंप्रचावरचा मोह गेला पाहिजे. कामना जरी असल्या तरी भजन हे चालूच ठेवावे त्या भजनाच्या योगें एक कामना तरी जातील किंवा त्या पूर्ण होऊन मग हा निष्काम होईल.

***निष्काम मात्र फलदायक या शरीरीं ।***
***जेणें प्रसन्न हरी कर्मजबंध हारी ।***
***जे काम्ययत्न तितुके क्रियमाण होती ।***
***होऊनी संचित पुढें फलयासी देती ।।***
***(वा.प.)***



निष्काम कर्माचे फळ याच देहीं मिळते तेव्हा हे सर्व आपल्या हातीं आहे. प्रयत्नवाद परमार्थांत व प्रारब्धवाद प्रपंचात तेव्हा आपण प्रयत्न करावे.

***निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेंची फळ ।।***
***निश्चय करून बसावें की (याच देहीं याच डोळां ।***
***भोगीन मुक्तीचा सोहळा ।।) मग तो पूर्ण होईल.***
***जाणेल जो कल्पवृक्षपणे । आणि मागेल त्यासी काय उणें ।***
***भक्त श्रेष्ठ या गुणें । कीं जाणोनी त्याचीच भक्ती मागती त्यापासी ।।***

म्हणून भगवंताकडे त्याची भक्तीच मागावी.

✦✦✦

# परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईंच्या प्रवचनांतील

## अमृत कण

१) जो ईश्वरभावनेवांचून ब्रही काढीत नाही त्याचे वचन त्रिकाळ सत्यच असले पाहिजे. एवंच ‘एकपत्नी’, ‘एकबाण’, ‘एकवचन’ ह्या व्रतांचा अर्थ श्रीरामचंद्राचे विचार, आचार व उच्चार एक ईश्वरप्रीत्यर्थच होते असा आहे.

२) ज्याप्रमाणें मातेच्या सर्वांगात दूध असूनही बालकास ते स्तनद्वाराच प्राप्त होते. त्याप्रमाणे ईश्वराचे दयाळूत्व त्याच्या सर्वांगात असूनही ते चरणांतूनच प्रगट होते. याकरितांच सर्व संतांनी भगवंताचा चरणमहिमा गायिला आहे.

३) आमच्यामध्ये सत्त्वगुण कमीजास्त प्रमाणाने वास करीत असल्यामुळे आम्हास बरेवाईट समजते, याकरिता आम्ही सत्य म्हणजे खरे बोलावे व अहिंसा आचरावी, म्हणजे दुसऱ्यास पीडा करू नये असा ईश्वराचा मानवी देह निर्माण करण्याचा हेतू आहे. न्याय करणे किंवा समता दाखविणे हे सर्वांस शक्य नसते. परंतु खरे बोलणे व सत्याच्या मार्गाने चालणे हे प्रत्येक मनुष्याच्या स्वाधीन आहे. तसेच लोकांस सुख देण्याचे साधन सर्वांजवळ असणे संभवनीय नाही, तथापि दुसऱ्यास दु:ख न देणे हे प्रत्येकाच्या स्वाधीन आहे.

४) गुरु हा ईश्वराची भेट करून देत असल्यामुळे सर्वांहून तो श्रेष्ठ आहे (ब्रह्म सर्वांचे प्रकाशक । सद्गुरु तयाचाही प्रकाशक । एवं गुरुहूनि अधिक । नाहीं आणिक पूज्यत्वें ।। ए.भा.)



५) ईश्वर हा कल्पवृक्षसमान असून ज्या रूपीं ज्यांचा जैसा भाव त्या रूपें त्यांस तैसींच फळें मिळतात, म्हणजे सगुणभक्तांस सगुणमुक्ति, निर्गुणोपासकांस कैवल्य आणि अन्य देवतांच्या रूपानें भजणारांस स्वर्गादि नाशवंत फळें प्राप्त होत असतात.

६) श्रीभगवद्गीतेच्या पाचव्या अध्यायांत ‘स्वभावस्तु प्रवर्तते’ असे म्हटले आहे. याचा अर्थ असा की, जीवांकडून पूर्वसंस्कारांनुरूप, जी काही बरी वाईट कर्में घडतात, त्यांची फळे ते प्रारब्धेकरून भोगितात. ईश्वर काहीच करवीत नाही. तो सूर्यासारखा अलिप्त असता. ह्यावरून तो विषम, निर्दय नसून सम, सदय व निर्दोष आहे असे सिद्ध होते.

✦✦✦

।। श्री सद्गुरु प्रसन्न ।।

## (एप्रिल ते जून २०२१) महिन्यातील उत्सव व महोत्सव

यापुढे लॉकडाऊन व बंधन संपून आपण सर्वजण हे उत्सव साजरे करू शकू अशी आशा व श्री सद्गुरुंची प्रार्थना करूया :-

**चैत्र मास:**

| | | |
|---|---|---|
| मंगळवार | दि.१३.४.२०२१ (चैत्र शुद्ध प्रतिपदा) | गुढीपाडवा. प्रात: स्मरणाचेवेळी स्तवन व प्रार्थना. रात्रौ ९ वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| मंगळवार | दि.२०.४.२०२१ (चैत्र शुद्ध ८) (अष्टमी) | श्री लक्ष्मण महाराज व श्री नारायण महाराज (इंदूर) पादुका स्थापनेचा वर्धापन दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| बुधवार | दि. २१.४.२०२१ (चैत्र शुद्ध ९) | श्री रामनवमी व श्री सोहिरोबा नाथ पुण्यतिथी. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. श्री रामजन्मोत्सव दुपारी १२ वाजता पाळणा व इतर पदे. नंतर पालखी मिरवणूक. |
| मंगळवार | दि.२७.४.२०२१ (चैत्र पौर्णिमा) | श्री हनुमान जयंती. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. जन्मोत्सव सकाळी ६.३० वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक रात्रौ ९ वाजता. |
| रविवार | दि. ९.५.२०२१ (चैत्र वद्य १३) | श्री अक्कल कोटस्वामी महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. ११.५.२०२१ (चैत्र वद्य १५) | गुरुमाता श्री पार्वतीमाता जयंती दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. |

**वैशाख मास : परमभगवद्भक्त श्री वामनपंडितांचा पुण्यतिथ्योत्सव**

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. १४.५.२०२१ (वैशाख शुद्ध तृतीया) | सायंकाळी ५.३० नंतर हळदीकुंकू. अक्षय तृतीया श्री परशुराम जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |



| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. १७.५.२०२१ (वैशाख शुद्ध पंचमी) | आद्य शंकराचार्य व श्री रामानुजाचार्य जयंती सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. १८.५.२०२१ (वैशाख शुद्ध षष्ठी) | श्री वामन पंडितांचा पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण. सायंकाळी ५ वाजता चरित्र वाचन व इतर पदे. रात्रौ ९ वाजता सद्भक्ती मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| बुधवार | दि. १९.५.२०२१ (वैशाख शुद्ध सप्तमी) | सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन. |
| गुरुवार | दि. २०.५.२०२१ (वैशाख शुद्ध अष्टमी) | दुर्गाष्टमी. सायंकाळी ६ वाजता ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. रात्रौ ८ वाजता गुरुवर्य श्री भाईंचा शेजोत्सव व समाप्ती दिन. गुरुवरांनी आम्हां बालकांची सेवा मान्य करून घ्यावी व सर्व संकटांचे निवारण करून आम्हाला मंदिरात सेवेसाठी यावयास मिळावे. सद्गुरुंनी ती सोय करावी हीच विनम्र प्रार्थना. |
| मंगळवार | दि. २५.५.२०२१ (वैशाख शुद्ध १४) | श्री नृसिंह जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

**गुरुवर्य श्री बाबांचा पुण्यतिथ्योत्सव**

| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. ९.६.२०२१ (वैशाख वद्य १४) | गुरुवर्य श्री बाबांचा पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. 'पितापुत्र व गुरुशिष्य प्रेम' या प्रवचन वाचनास प्रारंभ. |

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. ११.६.२०२१ (ज्येष्ठ प्रतिपदा) | गंगादशहरा प्रारंभ. सायंकाळी ६ वाजता हळदीकुंकू समारंभ. |
| शनिवार | दि. १२.६.२०२१ (ज्येष्ठ २) | सायंकाळी ६ वाजता नाम संकीर्तन. |
| रविवार | दि. १३.६.२०२१ (ज्येष्ठ ३) | गुरुवर्य श्री बाबांच्या ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. उत्सव समाप्ती. गुरुवरांनी आम्हा अज्ञ बालकांची सेवा गोड मानून घ्यावी अशी कळकळीची प्रार्थना. |
| रविवार | दि. २०.६.२०२१ (ज्येष्ठ शुद्ध १०) | गंगावतरण दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

**आषाढ मास: (जुलै ते सप्टेंबर २०२१) महिन्यातील उत्सव व महोत्सव**

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. ५.७.२०२१ (ज्येष्ठ कृ ११) | श्री निवृत्तीनाथ पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. २०.७.२०२१ (आषाढी एकादशी - देवशयनी एकादशी) | सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| शुक्रवार | दि. २३.७.२०२१ (आषाढी पौर्णिमा - गुरुपौर्णिमा) (व्यास पौर्णिमा) | गुरुपौर्णिमा. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता पादुकांस एकादशणी. त्यानंतर महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता परमार्थदीपिका वाचन. |
| रविवार | दि. २५.७.२०२१ (आषाढी वद्य द्वितीया) | परमप्रिय सद्‌गुरु श्री दादाभाई जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता जन्मोत्सव. पाळणा व इतर पदे. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव. |
| सोमवार | दि. २६.७.२०२१ (आषाढी वद्य तृतीया ) | नामसंकीर्तन. |



| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. २८.७.२०२१ (आषाढी वद्य पंचमी ) | आद्य सद्‌गुरु श्री नारायण महाराज पुण्यतिथी व जयंतीदिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. |
| गुरुवार | दि. २९.७.२०२१ (आषाढी वद्य षष्ठी ) | सायंकाळी ५.३० वाजता सद्‌गुरु नारायण महाराज व सद्‌गुरु दादाभाई विरचित ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण व समाप्ती दिन. कळकळीची विनंती. |

**ऑगस्ट :**

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. १.८.२०२१ | इंग्रजी तारखेनुसार गुरुवर्य श्री भाईंचा जयंतीदिन. |
| शुक्रवार | दि. ६.८.२०२१ (आषाढी वद्य त्रयोदशी ) | श्री नामदेव महाराज पुण्यतिथी. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| शनिवार | दि. ७.८.२०२१ (आषाढी वद्य चतुर्दशी ) | श्री सावतामाळी पुण्यतिथी दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

**श्रावणमासारंभ :**

| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. १८.८.२०२१ (श्रावणशुद्ध ११) (पुत्रदा एकादशी) | गुरुवर्य श्री भाईंची जयंती. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५ वाजता चरित्र वाचन व इतर पदे. सायंकाळी ७.४७ वाजता जन्मोत्सव, पाळणा व इतर पदे. |
| रविवार | दि. २२.८.२०२१ (श्रावण पौर्णिमा - नारळी पौर्णिमा) | श्रावणी व होमहवन इत्यादी. |
| सोमवार | दि. २३.८.२०२१ (श्रावण वद्य प्रतिपदा) | श्री सिद्धारूढ स्वामी पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. २९.८.२०२१ (श्रावण वद्य सप्तमी) | श्री लक्ष्मण महाराज पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. |
| सोमवार | दि. ३०.८.२०२१ (श्रावण वद्य अष्टमी) | जन्माष्टमी श्री कृष्ण जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. श्रीकृष्ण जन्मोत्सव रात्रौ १२ वाजता. रात्रौ १० ते १२ श्री रमा वल्लभदासांची पदे व त्यानंतर जन्म व पाळणा व पदे, प्रार्थना. |
| मंगळवार | दि. ३१.८.२०२१ (श्रावण वद्य नवमी) | गोपाळकाला. सद्भक्ती मंदिराचा वर्धापन दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी व इतर पदे. |
| **भाद्रपद मास :** | | |
| शुक्रवार | दि. १०.९.२०२१ (भाद्रपद शुद्ध चतुर्थी) | श्री गणेश चतुर्थी. स्तवन व प्रार्थना. |
| शुक्रवार | दि. १७.९.२०२१ (भाद्रपद शुद्ध ११) | श्री निरंजन रघुनाथ स्वामी महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. २१.९.२०२१ (भाद्रपद वद्य प्रतिपदा) | सद्गुरु श्री दादाभाई महालय दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. |
| **(ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१)** | | |
| शनिवार | दि. २.१०.२०२१ | श्री बलभीम महाराज पुण्यतिथी. सकाळी ७ वा. स्तवन व प्रार्थना. |
| गुरुवार | दि. ७.१०.२०२१ (आश्विन शुद्ध प्रतिपदा) | घटस्थापना. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. प्रतिपदा ते नवमीपर्यंत सायंकाळी ५ वाजता नवरात्रौपासन, दुर्गास्तोत्र, व 'कलौ चंडी विनायको'चे वाचन. |
| गुरुवार | दि. १४.१०.२०२१ | श्री रामेश्वर मंदिरात सद्भक्ति प्रसारक मंडळातर्फे रात्रौ रंगपूजा, आरती व प्रसाद. |



| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. १५.१०.२०२१ (आश्विन शुद्ध प्रतिपदा) | विजयादशमी - दसरा. सद्भक्ती प्रसारक मंडळींचा वाढदिवस. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५ वाजता प्रवचन, वाचन व सोने वाटप. सायंकाळी ६.३० वाजता पालखी मिरवणूक. ही पालखी सारस्वत कॉलनी व हिंदू फ्रेंडस सोसायटी. या दोन्ही सोसायट्यामधून प्रस्थान करते. |
| **गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथी महोत्सव** | | |
| मंगळवार | दि. १९.१०.२०२१ (आश्विन पौर्णिमा - कोजागिरी पौर्णिमा) | सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५ वाजता गुरुवर्य श्री भाईंच्या प्रथम पुण्यतिथी दिनी झालेल्या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन. सायंकाळी ७ वाजता श्री कृष्ण भक्तिपर पदे व रासलिलाभिनय. |
| शनिवार | दि. २३.१०.२०२१ (आश्विन वद्य तृतीया) | गुरुवर्य व भाईंची पुण्यतिथी व श्री बाळेकुंद्री महाराज पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. ११.३० वा. एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन व इतर पदे. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव. |
| रविवार | दि.२४.१०.२०२१ | नामसंकीर्तन सायं. ५.३० वा. |
| सोमवार | दि. २५.१०.२०२१ | ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |
| मंगळवार | दि. २.११.२०२१ (आश्विन वद्य द्वादशी) | गुरुद्वादशी - सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५.३० वाजता गुरुद्वादशी निमित्य झालेल्या गुरुवर्य श्री भाईंच्या प्रवचनाचे वाचन. ८.३० वाजता पालखी मिरवणूक. |

| | | |
|---|---|---|
| गुरुवार | दि. ४.११.२०२१ (आश्विन वद्य चतुर्दशी) | नरकचतुर्दशी. सकाळी स्तवन व प्रार्थना. सकाळी १०.०० वाजता श्री रामेश्वर मंदिरात 'उद्धव-गोपी' गीताचे सामुदायिक भजन व इतर पदे. |
| शुक्रवार | दि. ५.११.२०२१ (आश्विन वद्य प्रतिपदा) | बलिप्रतिपदा. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. सकाळी १०.०० वाजता सुखासना निमित्त झालेल्या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन ११.३० वाजता एकादशणी. |
| रविवार | दि. १४.११.२०२१ (कार्तिकी - प्रबोधिनी एकादशी) | प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५.०० वाजता 'पंढरीचा प्रसादमेवा' या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन. |
| गुरुवार | दि. १८.११.२०२१ (कार्तिक शुद्ध चतुर्दशी - वैकुंठ चतुर्दशी | गुरुवर्य श्री भाईंचा अस्थिविसर्जन दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. ८.३० वाजता कमळे वाहणे. |
| शुक्रवार | दि. १९.११.२०२१ (कार्तिक पौर्णिमा - त्रिपुरारी पौर्णिमा) | सकाळी स्तवन व प्रार्थना. रात्रौ ८.३० वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| शनिवार | दि. २७.११.२०२१ (कार्तिक वद्य सप्तमी - अष्टमी) | श्री काळभैरव जयंती. प्रात: स्मरणानतर स्तवन व प्रार्थना. |
| गुरुवार | दि. २.१२.२०२१ (कार्तिक वद्य त्रयोदशी) | श्री ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथीदिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| **गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथी महोत्सव** | | |
| सोमवार | दि. १०.१२.२०२१ (मार्गशीर्ष शुद्ध दशमी) | श्री निरंजन रघुनाथ स्वामी पादुका स्थापना दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता **एकादशणी.** |
| मंगळवार | दि. १४.१२.२०२१ (मार्गशीर्ष शुद्ध एकादशी | श्री गीता जयंती व श्री माणिक प्रभु महाराज पुण्यतिथी. |



| | | |
|---|---|---|
| | - मोक्षदा एकादशी) | सकाळी स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता सामुदायिक गीता पठण. सायंकाळी ५.३० वाजता श्री गीताजयंती निमित्य झालेल्या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाने वाचन. |
| शनिवार | दि. १८.१२.२०२१ (मार्गशीर्ष पौर्णिमा) | श्री दत्तजयंती. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता **एकादशणी.** त्यानंतर महाप्रसाद. जन्मोत्सव सायंकाळी ६ वाजता पाळणा व इतर पदे. रात्रौ ८.३० वाजता पालखी व मिरवणूक. |
| रविवार | दि. १९.१२.२०२१ | सायंकाळी ६ वाजता **नामसंकीर्तन** व सुमधुर पदे. उत्सव समाप्ती व कळकळीची प्रार्थना. |
| सोमवार | दि. २०.१२.२०२१ | सायंकाळी ६ वाजता **ध्वनिमुद्रित** पदांचे श्रवण. |
| शनिवार | दि. २५.१२.२०२१ | श्री मोरया गोसावी पुण्यतिथी व श्री येशूख्रिस्त जयंती दिन व सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| बुधवार | दि. २९.१२.२०२१ | श्री रंगनाथ स्वामी पुण्यतिथी सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. सायंकाळी भजनाचे वेळी चरित्र वाचन. |

✦✦✦

# महत्वाच्या सूचना

ह्या अंकातील आणि ह्या आधीच्या अंकातील उल्लेख केलेले उत्सव - महोत्सव आपल्या सद्भक्ती मंदिरातील प्रथेनुसार देण्यात आलेले आहेत. परंतु विद्यमान सरकारी आदेश आणि त्याप्रमाणे पाळण्यात येणारा लॉक डाऊन ह्यामुळे जानेवारी ते मार्च महिन्यातील उत्सव थोडक्यात आणि अल्पावधीत फक्त गुरुजींच्या हस्ते आणि एक किंवा दोन मदतनीस भक्तांच्या उपस्थितीत साजरे करावे लागले होते.

तसेच पुढील उत्सव सालाबादप्रमाणे साजरे केले जाणार की वर उल्लेख केल्याप्रमाणे थोडक्यात ओटोपते घ्यावे लागणार हे त्या त्या वेळेस जाहीर केल्या जाणाऱ्या सरकारी आदेशांवर अवलंबून असेल. सद्य परिस्थितीत सरकारी आदेशानुसार कोणताही उत्सव अत्यंत छोट्या प्रमाणात, म्हणजे केवळ गुरुजी आणि एक किंवा दोन मदतनीस भक्तांच्या उपस्थितीत साजरा करावा लागणार आहे. पुढील सूचना येईपर्यंत तरी सर्व भक्तांना विनंती आहे की ह्या पुढील उत्सवांच्या तारखांच्या एक किंवा दोन दिवस आधी त्यांनी खालीलपैकी एखाद्या भक्ताशी संपर्क करून नंतरच सद्भक्ती मंदिरात दर्शनाला यावे, जेणेकरून सद्भक्तांची निराशा आणि गैरसोय होणार नाही.

१. श्री. नागानंद निळेश्वर - दू. भ्र. क्र. ९८२१२७०७७२
२. श्री. समीर रायकर - दू. भ्र. क्र. ९८२००८४०३०
३. श्री. रोहन दळवी - दू. भ्र. क्र. ९८६७४९४७४७
४. श्री. अरूण विजयकर - दू. भ्र. क्र. ९२२३२२२२४५

**टीप** : उत्सवाचे वेळी सध्या आपले माननीय गुरुजी पहाटे सूर्योदयसमयी गाभाऱ्यात, आतल्या आत श्री दत्तगुरुंची नित्यपूजा करतात आणि सर्व पादुकांना अभिषेक करतात. भक्तमंडळी आपापल्या घरी नामस्मरण, वाचन करतात. सरकारी आदेशानुसार भक्तांना दर्शनाकरिता मंदिरात सध्या प्रवेश नाही.

दररोज श्री दत्तगुरुंची नित्यपूजा माननीय गुरुजी पहाटे सूर्योदय समयी करतात. सरकारी नियमाचे पालन करूनच इतर सेवा शक्य तितक्या केल्या जातात.



# विनंती

सद्भक्ती प्रकाश हे त्रैमासिक आजवर आपण इ.स. १९२८ सालापासून प्रसिद्ध करीत आहोत. सद्गुरु श्री भाई, श्री दादाभाई ह्यांचे आणि इतरही संतांचे विचार सर्वत्र प्रसारित होऊन, सद्भक्ती मंदिरातील घडामोडींचा आढावा आणि नजीकच्या काळात होणाऱ्या उत्सव-महोत्सवा विषयीची समग्र माहिती ह्या त्रैमासिकातून भक्तगणांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न ह्या नियतकालिकातर्फे आपण करीत असतो.

मुंबई शहराबाहेरील सभासदांना त्यांची प्रत पोस्टाने पाठवली जाते. तर स्थानिक सभासद सद्भक्ती मंदिरात येऊन आपापली प्रत घेऊन जातात.

गेल्या काही वर्षात छपाईच्या खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. सभासदांकडून जी काही वर्गणी पूर्वी घेतली आहे ती त्या काळात योग्य अशीच होती किंवा असावी. मात्र आता त्या वर्गणीच्या रकमेमध्ये हा छपाईचा आणि पोस्टाचा खर्च अजिबात भागत नाही.

**सभासदांकडून अधिक वर्गणी मागण्याची सद्भक्ती प्रसारक मंडळींची इच्छा नाही.**

त्या ऐवजी अलीकडेच विकसित झालेल्या आपल्या वेबसाईटवर सद्भक्ती प्रकाश हे त्रैमासिक अपलोड केले जाईल.

ज्या सभासदांना इंटरनेटची सुविधा नाही किंवा इतर काही कारणामुळे वेबसाईट वरील माहिती वाचणे शक्य नसेल त्यांनी खालीलपैकी एखाद्या कार्यकर्त्यांशी संपर्क करावा. आपापले मोबाईल नंबर्स आणि ई-मेल ॲड्रेस (असल्यास) पाठवून द्यावेत.

ज्यांना हे शक्य आहे त्यांना विनंती आहे की त्यांनी देखील आपले मोबाईल नंबर्स आणि ई-मेल ॲड्रेस वर उल्लेख केलेल्या कार्यकर्त्यांपैकी कुणालाही पाठवून द्यावा, जेणेकरून जेव्हा त्रैमासिक अपलोड केले जाईल तेव्हा त्याची सूचना देता येईल.

**सर्व सभासदाना विनंती आहे की ह्या विनंतीच्या संदर्भात त्यांनी जरूर संपर्क साधावा.**

**संपर्क :-**

१. श्री. विवेक ताम्हाणे - दू. भ्र. क्र. ९८२०३५०८६७
२. श्री. नागानंद निळेश्वर - दू. भ्र. क्र. ९८२१२७०७७२
३. श्री. अरूण विजयकर - दू. भ्र. क्र. ९२२३२२२२४५

✦✦✦

# : निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबई बाहेर, काही महाराष्ट्रा बाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरूवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता सद्भक्ती प्रसारक मंडळींचे दोन बँक अकाऊंट्स आहेत. त्यापैकी कुठल्याही एका अकाऊंटला पैसे पाठवू शकता. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| **Name of the Account** | **:** | **SADBHAKTI PRASARAK MANDALI** |
| **Bank Name** | **:** | NKGSB Co.Op. Bank Ltd. |
| **Account No** | **:** | 00610010000130 |
| **IFSC Code No.** | **:** | NKGS0000006 |
| **Branch** | **:** | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |
| | | **OR** |
| **Bank Name** | **:** | Bank Of India |
| **Account No** | **:** | 016410110005797 |
| **IFSC Code No.** | **:** | BKID0000164 |
| **Branch** | **:** | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |

ज्या भक्तांना नेट बँकिंगचा उपयोग न करता पैसे चेक किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवायचे असतील, त्यांनी कृपया खालील पत्त्यावर पाठवावे. त्वरित आणि सुरक्षित डिलिव्हरी करिता स्पीडपोस्ट किंवा कुरिअरचा वापर करावा.



**Mr. Vivek Tamhane**
Tamhane & Mehta (Chartered Accountants)
1, Gauresh Apartment, Ground Floor, Old Police Lane,
Near Andheri Court, Andheri (East), Mumbai : 400 069.
**Tel No. : 022-2683 2838**

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :-

| | | |
|---|---|---|
| **१. श्री. विवेक ताम्हाणे** | **भ्रमणध्वनी :** | ९८२०३५०८६७ |
| **२. श्री. नागानंद निळेश्वर** | **भ्रमणध्वनी :** | ९८२१२७०७७२ |
| **३. श्री. अरूण विजयकर** | **भ्रमणध्वनी :** | ९२२३२२२२४५ |

✦✦✦

Regd. No. 9023/57

बुक पोस्ट

प्रति,

SADBHAKTI PRAKASH

द्वारा
**सद्भक्ति-प्रसारक मंडळी**
श्रीशंकर लॉज, सरस्वतीबाग,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०००६०.

**शब्दविकास :** विद्या धुमे, विकास प्रिंटर्स, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई : ६०.फोन : २८२४५२७२




(वर्ष ९३) पौष ते फाल्गुन शके १९४२ - एप्रिल ते जून २०२१ (संयुक्तांक ७ ते ९)

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल / वृत्तनिवेदन | १ |
| २) | गुरुवर्य श्री. भाईंचे प्रवचन | ४ |
| ३) | सद्‌गुरु श्री. दादाभाईंचे प्रवचन | १२ |
| ४) | अमृतकण | १८ |
| ५) | उत्सव - महोत्सवांतील कार्यक्रम | २० |
| ६) | महत्वाच्या सूचना | २८ |
| ७) | विनंती | २९ |
| ८) | निवेदन | ३० |
| ९) | कळकळीची प्रार्थना | ३२ |